बुधवार दि. १४ ऑक्टोबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक ४२ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद माने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### जिल्ह्यात कुष्ठरोग सर्वेक्षण व लक्षित कुष्ठरोग शोध अभियान

## संशयित रुग्णांचा शोध घेऊन त्वरित उपचार करावे- डॉ. कृष्णकांत कनवारीया

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यात कुष्ठरोगाचे निर्मूलन करण्यासाठी सुरू असलेल्या कुष्ठरोग सर्वेक्षण व लक्षित कुष्ठरोग शोध अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्ण कांत कनवारीया यांनी दिले आहेत. त्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संबंधित समित्यांची संयुक्त बैठक घेण्यात आली.

जिल्ह्यात १६ सप्टेंबर ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत कुष्ठरोग सर्वेक्षण व लक्षित कुष्ठरोग शोध अभियान राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत सर्व तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात सर्वेक्षण प्रभावीपणे व गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. कुष्ठरोगाचे रुग्ण प्रारंभिक अवस्थेत शोधून त्यांना औषधोपचाराखाली आणणे, तसेच शासनाने निर्धारित केलेले शून्य कुष्ठरोग प्रसाराचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन करण्यात आले.




जिल्ह्यात संसर्गजन्य रुग्णांचे प्रमाण लक्षात घेता संशयित कुष्ठरुग्णांचा शोध घेण्यासाठी त्यांच्या घराजवळील, शेजारील तसेच कामाच्या ठिकाणाजवळील परिसरातील आणि आजूबाजूच्या ३०० घरांचे गुणवत्तापूर्ण सर्वेक्षण करण्यावर भर देण्यात आला आहे. कुष्ठरोगाच्या रुग्णांच्या सहवासात असलेल्या व्यक्तींना प्रतिबंधात्मक औषधाची एक मात्रा (पीईपी) देण्याबाबतही सूचना करण्यात आल्या आहेत.

कुष्ठरोगाची पुढील प्रमुख लक्षणे असुन, यामध्ये, त्वचेवर फिकट किंवा लालसर बधिर चट्टे पडणे व त्या ठिकाणी घाम न येणे. त्वचा जाड, बधिर किंवा तेलकट दिसणे. त्वचेवर गाठी येणे आणि कानाच्या पाळ्या जाड होणे. हातापायांची बोटे वाकडी होणे, मुंग्या येणे किंवा बधिरता जाणवणे. भुवयांचे केस विरळ होणे किंवा डोळे पूर्ण बंद करता न येणे. त्वचेवर थंड व गरम संवेदना जाणवत नसणे हे लक्षणे आढळल्यास नागरिकांनी जवळच्या शासकीय आरोग्य केंद्रात तपासणी करून घ्यावी. कुष्ठरोगाचे लवकर निदान व नियमित उपचार केल्यास विकृती टाळण्यास मदत होते. त्यामुळे नागरिकांनी लक्षणांकडे दुर्लक्ष न करता आरोग्य विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले.

या बैठकीस जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर शेळके, आरोग्य सेवा (कुष्ठरोग) विभागाचे अधिकारी, जिल्हा क्षयरोग अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, जागतिक आरोग्य संघटनेचे प्रतिनिधी तसेच जिल्हा व तालुका स्तरावरील आरोग्य अधिकारी उपस्थित होते.

## सेवा संकल्प अभियान अंतर्गत आरोग्यविषयक उपक्रमांचे आयोजन

**जालना - प्रतिनिधी**

सार्वजनिक आरोग्य विभाग, जिल्हा परिषद जालना यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'सेवा संकल्प अभियानांतर्गत' जिल्ह्यात विविध आरोग्यविषयक उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अभियानाच्या माध्यमातून नागरिकांना आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येत आहे. या अभियानांतर्गत दि. १३ आज रोजी जालना तालुक्यातील प्राथमिक आरोग्य उपकेंद्र डुकरी पिंपरी आणि पिरपिंपळगाव, तसेच अंबड तालुक्यातील प्राथमिक आरोग्य



उपकेंद्र मठ पिंपळगाव, तसेच जाफ्राबाद तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र डोंणगाव येथे एचपीव्ही लसीकरणाबाबत जनजागृती व लसीकरणाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी किशोरवयीन मुलींच्या आरोग्याचे महत्त्व लक्षात घेऊन एचपीव्ही लसीकरणाची माहिती देण्यात आली. या उपक्रमामुळे मुलींमध्ये लसीकरणाबाबत जागरूकता निर्माण होण्यास मदत होत आहे. या अभियानांतर्गत धनगरपिंपरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत उपकेंद्र मठ पिंपळगाव येथे ३ मुली, विरेगाव येथील उपकेंद्र डुकरी पिंपरी येथे ४ मुली, प्राथमिक आरोग्य केंद्र, डोंणगाव येथे ६ मुली, प्राथमिक आरोग्य केंद्र पिरपिंपळगाव येथे ५ मुली, तसेच जिरडगाव येथील उपकेंद्रातील (पान २ वर)

## १७३ गाव पाणीपुरवठा योजनेचा राणी वाहेगाव येथील पंप दोन दिवसांत सुरु; ११ गावांना दिलासा

### आमदार लोणीकरांचा तातडीने पाठपुरावा

**परतुर - प्रतिनिधी**

राणी वाहेगाव येथील १७३ गाव पाणीपुरवठा योजनेचा पंप बिघडल्यामुळे परिसरातील ११ गावांचा पाणीपुरवठा विस्कळीत झाला होता. सध्याच्या दुष्काळी परिस्थितीत पाण्याची टंचाई अधिक गंभीर बनली असताना आमदार बबनराव लोणीकर यांनी या समस्येची तात्काळ दखल घेत संबंधित यंत्रणेला पंप सुरू करण्याच्या सूचना दिल्या. त्यांनी स्वतः सातत्याने पाठपुरावा



केल्यामुळे अवघ्या दोन दिवसांत पंप सुरू करण्यात आला. त्यामुळे संबंधित गावांतील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला.

**पाणीपुरवठा विस्कळीत झालेली गावे :**

१. वरफळ, २. वरफळ वाडी, ३. मापेगाव, ४. खांडवी, ५. पिंप्रळा, ६. गणेशपूर, ७. तोरना, ८. शिरसगाव, ९. टाकळी रघोपंत१०. खांडवी वाडी, ११. रायपूर दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्राधान्याने सोडवण्यासाठी आमदार बबनराव लोणीकर यांनी दाखवलेली तत्परता आणि केलेला पाठपुरावा नागरिकांसाठी दिलासादायक ठरला.

## धर्मकार्यातील आवडीसोबत नामस्मरणही मनापासून करा; समस्त हिंदू समाजाने एकजुटीने राहणे काळाची गरज - पुरुषोत्तम महाराज पाटील

### राहुल लोणीकर मित्र मंडळाच्या नवरात्र महोत्सवातील कीर्तनातून सामाजिक एकतेचा संदेश

**परतूर - प्रतिनिधी**

परमार्थाची सेवा आपण ज्या आवडीने आणि निष्ठेने करतो, त्याच भक्तिभावाने देवाचे नामस्मरण आणि चिंतनही केले पाहिजे. समाजात एकोपा, परस्परांविषयी आदर आणि धर्माबद्दल आत्मीयता असणे आवश्यक आहे. आपसातील मतभेद आणि राजकीय विरोधातून आपणच एकमेकांना विरोध करू लागलो, तर समाजाच्या एकतेला तडा जातो. त्यामुळे सर्वांनी मतभेद बाजूला ठेवून एकजुटीने राहण्याची गरज आहे, असे प्रतिपादन हरिभक्त परायण पुरुषोत्तम महाराज पाटील यांनी




केले.

राहुल लोणीकर मित्र मंडळाच्या वतीने आयोजित राष्ट्रमाता जिजाऊ नवरात्र महोत्सवातील कीर्तनप्रसंगी ते बोलत होते. या वेळी माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष राहुल लोणीकर यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी राष्ट्रमाता जिजाऊ नवरात्र उत्सवामागील भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन हे केवळ उत्सव साजरा करण्यापुरते मर्यादित नसून, त्यातून समाजाला चांगले विचार मिळावेत, सामाजिक जाणीव जागृत व्हावी आणि नव्या पिढीवर संस्कार घडावेत, हा (पान २ वर)

## जिल्हा परिषदेत १४ ऑक्टोबरला पेन्शन अदालत

**जालना - प्रतिनिधी**

सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शनविषयक तक्रारींचे निराकरण करण्यासाठी बुधवार, दि. १४ ऑक्टोबर २०२६ रोजी जिल्हा परिषद जालना येथे पेन्शन अदालत आयोजित करण्यात आली आहे. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) जिल्हा परिषद जालना यांच्या दालनात ही पेन्शन अदालत होणार आहे.

विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील उपआयुक्त (आस्थापना) यांच्या दि. २४ जुलै २०१९ रोजीच्या पत्रातील निर्देशानुसार सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी ही पेन्शन अदालत आयोजित करण्यात आली आहे.

पेन्शन अदालतीचे विभागनिहाय वेळापत्रक निश्चित करण्यात आले असून, सकाळी ११ ते ११.३० या वेळेत शिक्षण (प्राथमिक), कृषी, आरोग्य, महिला व बालकल्याण विभागांशी संबंधित प्रकरणे हाताळण्यात येतील. सकाळी ११.३० ते दुपारी १२ या वेळेत सामान्य प्रशासन, वित्त, पंचायत व सिंचन विभागांच्या तक्रारींची सुनावणी होईल. तर दुपारी १२ ते १२.३० या वेळेत ग्रामीण पाणीपुरवठा, बांधकाम, पशुसंवर्धन व समाजकल्याण विभागांशी संबंधित (पान २ वर)



जालना शहरातील मोतीबागेजवळ मंगळवारी (दि. १३) रोजी वाळूच्या टिप्पर चे टायर फुटल्यामुळे ट्रॅक्टर ट्रक टिप्पर चा अपघात झाला या अपघातात टिप्पर चे नुकसान झाले असून महानगरपालिका चे कचऱ्याचे ट्रॅक्टर पलटी झाले असून ड्रायव्हरला किरकोळ मार लागला व कोणाचीही जीवित हानी झाली नाही. ***छायाचित्र किरण खानापुरे***

## डॉ. गोपाळ तुपकर यांची शिक्षण विस्तार अधिकारीपदी पदोन्नती

### *पंचायत समिती मंठा येथे नियुक्ती; शिक्षक व शिक्षणप्रेमींकडून अभिनंदन*

**जालना - प्रतिनिधी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पेवा येथील प्राथमिक पदवीधर शिक्षक डॉ. गोपाळ तुपकर यांची शिक्षण विस्तार अधिकारीपदी पदोन्नती झाली आहे.



१२ ऑक्टोबर २०२६ रोजी जिल्हा परिषदेच्या व्हीसी हॉलमध्ये झालेल्या निवड प्रक्रियेत त्यांच्यासह जिल्ह्यातील १० शिक्षकांना शिक्षण विस्ताराधिकारीपदी पदोन्नती देण्यात आली आहे. डॉ. तुपकर यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले असून, त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना जालना जिल्हा परिषदेचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. त्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेच्या आधारे त्यांची पंचायत समिती, मंठा येथे (पान २ वर)

## राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत जालन्याच्या खेळाडूंची चमक; तीन पदकांची कमाई!

### *४७ व्या महाराष्ट्र स्टेट कराटे चॅम्पियनशिपमध्ये निवांशी वलकट्टी, तन्वी खरटमल आणि मोहन झुंझुर यांचे यश; ३० जिल्ह्यांतील ९०० हून अधिक खेळाडूंचा सहभाग*

**जालना । प्रतिनिधी**

मुंबईतील अंधेरी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे १० आणि ११ ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या ४७ व्या महाराष्ट्र स्टेट कराटे चॅम्पियनशिप २०२५-२६ या राज्यस्तरीय स्पर्धेत जालना जिल्ह्यातील कराटेपटूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. महाराष्ट्रातील ३० जिल्ह्यांमधून ९०० हून अधिक खेळाडूंनी सहभाग घेतलेल्या या स्पर्धेत जालन्याच्या तीन खेळाडूंनी कांस्यपदकांची कमाई करत जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रात आपला ठसा उमटविला. या




यशामुळे जालना जिल्ह्यातील कराटेपटूंच्या मेहनतीला आणि त्यांच्या प्रशिक्षणाला यश मिळत असल्याचे अधोरेखित झाले आहे. या राज्यस्तरीय स्पर्धेत जालना जिल्ह्यातील खेळाडूंनी काता आणि कुमिते या प्रकारांमध्ये मिळून १४ इव्हेंटमध्ये सहभाग नोंदविला. विविध जिल्ह्यांतील अनुभवी आणि गुणवंत खेळाडूंशी सामना करताना जालन्याच्या खेळाडूंनी कौशल्य, चपळता, शिस्त आणि आत्मविश्वासाच्या जोरावर आपली गुणवत्ता दाखवून दिली. या स्पर्धेत जालना जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या कु. निवांशी नवीनकुमार वलकट्टी हिने १० वर्षांखालील मुलींच्या २५ किलोपेक्षा अधिक वजनगटातील कुमिते प्रकारात तृतीय क्रमांक मिळवत कांस्यपदक पटकाविले. निवांशी ही नारायणा ई-टेक्नो स्कूल, जालना येथील विद्यार्थिनी आहे. कमी वयात राज्यस्तरीय स्पर्धेत पदक मिळविण्याची तिची कामगिरी उल्लेखनीय ठरली.

कु. तन्वी नितीन खरटमल हिने १४ वर्षांखालील मुलींच्या काता प्रकारात तृतीय क्रमांक मिळवत कांस्यपदक जिंकले. तन्वी ही राजर्षी शाहू शाळेची विद्यार्थिनी आहे. काता प्रकारात तंत्र, अचूक हालचाली, शरीराचा समतोल आणि एकाग्रता यांना विशेष महत्त्व असते. या निकषांवर आपली कामगिरी सादर करत तन्वीने पदक मिळविले.

मोहन शंकर झुंझुर याने १४ वर्षांखालील मुलांच्या काता प्रकारात तृतीय क्रमांक मिळवून (पान २ वर)

## जालन्याच्या कैलास झोळगे यांची थक्क करणारी झेप; आशियाई कांस्यपदकापर्यंतचा प्रेरणादायी प्रवास!

### शाकाहारी फुल आयर्नमॅनचा युवक-महिलांना संदेश - फिटनेस हीच खरी संपत्ती

**जालना - प्रतिनिधी**

जालना जिल्ह्याचे सुपुत्र, जलतरणपटू अष्टपैलू खेळाडू श्री. कैलास झोळगे यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर इतिहास रचला ऑलम्पिक संघटनेची संलग्न असलेल्या स्विमिंग फेडरेशन ऑफ इंडिया ( )यांच्या वतीने एशियन मास्टर्स स्विमिंग चॅम्पियनशिप स्पर्धा कर्नाटकातील बंगळुरू येथील द्रविड स्पोर्ट्स एक्सलन्स येथे अत्याधुनिक जलतरण संकुलात ४ ते १० ऑक्टोबर २०२६ दरम्यान मोठ्या




उत्साहात पार पडल्या मागील वर्षी जपान येथे पार पडली तर ह्या वर्षी भारताला यजमानपद भेटले दुसऱ्या आशियाई मास्टर जलतरण चॅम्पियनशिप मध्ये कैलास त्यांनी भारताच्या तिरंग्याची शान वाढवली आहे. आशिया खंडातील जपान, सिंगापूर, थायलंड, मलेशिया, चीन,इराण,ओमान,कझाकिस्तानसह २० हून अधिक देशांतील १२०० हून अधिक कसलेल्या आणि अनुभवी जलतरणपटूंच्या उपस्थितीत झालेल्या या प्रतिष्ठित स्पर्धेत १०० मीटर ब्रेस्टस्ट्रोक जलतरण या सर्वात तांत्रिक आणि ताकदीच्या प्रकारात त्यांनी कांस्यपदक पटकावत जालना जिल्ह्याचे नाव आशिया खंडात रोशन केले आहे. या प्रकारात पदकासाठी झालेली चुरस अत्यंत अटीतटीची होती, जिथे क्षणाच्या काही भागात पदकाचा फैसला होतो. अशा दबावाच्या परिस्थितीतही कैलासजींनी आपल्या वर्षानुवर्षांच्या अनुभवाच्या, अचूक तंत्राच्या आणि अफाट जिद्दीच्या जोरावर तिसरा क्रमांक पटकावला. स्विमिंग फेडरेशन ऑफ इंडियाच्या कठोर निवड चाचणीतून निवड होऊन, अनेक आर्थिक (पान २ वर)

# संपादकीय...

## अतिक्रमण हटविण्याचे नाटक नको; जालना शहराला कायमस्वरूपी मोकळा श्वास हवा!

जालना शहरातील अतिक्रमणांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. महानगरपालिका प्रशासनाकडून अतिक्रमण हटाव मोहिमा राबविल्या जातात, टपऱ्या आणि पत्र्यांचे शेड हटविले जातात, रस्ते व पदपथ मोकळे केले जातात; काही काळ नागरिकांना दिलासा मिळतो. मात्र, काही ठिकाणी पुन्हा अतिक्रमणे उभी राहत असल्याचे चित्र समोर येत असेल, तर प्रशासनाच्या कारवाईच्या परिणामकारकतेचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. पाणिवेस ते राजमहल टॉकीज परिसरातील अलीकडील कारवाई आणि मंठा चौफुली परिसरातील अतिक्रमणांच्या पुनरावृत्तीचा मुद्दा याच वास्तवाकडे लक्ष वेधतो. प्रश्न अतिक्रमण हटविले की नाही, हा नाही; प्रश्न अतिक्रमण पुन्हा होऊच कसे दिले जाते, हा आहे! महानगरपालिकेच्या पथकाने १२ ऑक्टोबर रोजी पाणिवेस ते राजमहल टॉकीज परिसरातील पाच ते सहा टपऱ्या आणि पत्र्यांचे शेड हटविल्याची माहिती समोर आली. सार्वजनिक रस्ते आणि पदपथ मोकळे ठेवण्याच्या दृष्टीने ही कारवाई महत्त्वाची आहे. मात्र, अशा मोहिमांचे मूल्यमापन करताना हटविलेल्या अतिक्रमणांची संख्या मोजण्यापलीकडे जावे लागेल. संबंधित जागा पुढील महिन्यातही मोकळी राहते का, पादचाऱ्यांना सुरक्षितपणे चालता येते का आणि वाहतुकीतील अडथळे कायमचे दूर होतात का, हेच कारवाईच्या यशाचे खरे निकष आहेत. अतिक्रमण हटाव मोहिमेच्या वेळी अधिकारी, कर्मचारी, सुरक्षा पथक आणि यंत्रसामग्री तैनात केली जाते. कारवाई होते, अतिक्रमणे हटविली जातात आणि रस्त्याचा काही भाग मोकळा होतो. मात्र, त्यानंतर त्या जागेवर नियमित देखरेख नसेल, तर पुन्हा अतिक्रमण उभे राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा वेळी पुन्हा मोहीम राबवायची, पुन्हा मनुष्यबळ खर्च करायचे आणि पुन्हा त्याच जागेवरील अतिक्रमण हटवायचे, हे चक्र किती काळ सुरू राहणार? प्रत्येक वेळी कारवाईसाठी लागणारा वेळ, मनुष्यबळ आणि सार्वजनिक निधी यांचा विचार करता प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक महत्त्वाच्या ठरतात. महानगरपालिका प्रशासनाने अतिक्रमण हटविण्याबरोबरच त्या जागेवर पुन्हा अतिक्रमण होऊ न देण्याची जबाबदारीही निश्चित केली पाहिजे. कारवाईनंतर संबंधित परिसराची नियमित पाहणी, तक्रारींवर तातडीची कार्यवाही आणि पुनरावृत्ती झाल्यास नियमानुसार कारवाई, अशी यंत्रणा कार्यान्वित झाल्याशिवाय मोहिमांना कायमस्वरूपी यश मिळणे कठीण आहे. मंठा चौफुली परिसरात यापूर्वी अतिक्रमण हटविण्याची कारवाई झाली असतानाही पुन्हा अतिक्रमणाची परिस्थिती निर्माण होत असल्याचा मुद्दा उपस्थित होत आहे. या अनुभवातून प्रशासनाने धडा घेण्याची गरज आहे. एका ठिकाणी अतिक्रमण हटविले जाते आणि दुसऱ्या ठिकाणी पुन्हा अतिक्रमण वाढते, असे चित्र असेल तर संपूर्ण शहराच्या पातळीवर नियोजन करण्याची आवश्यकता आहे. केवळ एखाद्या रस्त्यापुरती मोहीम राबवून प्रश्न सुटणार नाही. शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठा, पदपथ, वाहतुकीचे महत्त्वाचे मार्ग आणि नागरिकांची वर्दळ असलेल्या परिसरांची प्राधान्यक्रमाने पाहणी झाली पाहिजे. अतिक्रमण हटविल्यानंतर त्या जागेची स्थिती काय आहे, नव्याने अतिक्रमण झाले आहे का आणि संबंधित विभागाने किती वेळा पाहणी केली, याची नोंद ठेवली पाहिजे. मंठा चौफुलीवरील परिस्थितीची वस्तुनिष्ठ तपासणी करून पुनरावृत्तीची कारणे शोधणे आवश्यक आहे. केवळ पुन्हा कारवाई करण्यापेक्षा अतिक्रमण परत का उभे राहते, याचे उत्तर शोधणे अधिक महत्त्वाचे आहे. सार्वजनिक रस्ते आणि पदपथ हे नागरिकांच्या सामूहिक वापरासाठी आहेत. पादचाऱ्यांना चालण्यासाठी जागा नसेल, तर त्यांना वाहनांच्या गर्दीतून वाट काढावी लागते. ज्येष्ठ नागरिक, महिला, लहान मुले आणि दिव्यांग व्यक्तींना याचा अधिक त्रास सहन करावा लागू शकतो. वाहतुकीला अडथळा निर्माण झाल्यास कोंडी आणि अपघाताचा धोकाही वाढू शकतो. म्हणून अतिक्रमणाचा प्रश्न हा केवळ शहराच्या सौंदर्याचा किंवा प्रशासनाच्या प्रतिष्ठेचा प्रश्न नाही. तो नागरिकांच्या सुरक्षिततेशी, सार्वजनिक जागेच्या न्याय्य वापराशी आणि शहराच्या नियोजनाशी संबंधित आहे.सार्वजनिक जागेवर अनधिकृत बांधकाम करून इतरांच्या हक्कांवर मर्यादा आणण्यास परवानगी देता येणार नाही. नियम सर्वांसाठी समान असले पाहिजेत. कोणाची टपरी आहे, कोणाचा व्यवसाय आहे किंवा कोणाचा प्रभाव आहे, यापेक्षा अतिक्रमणाची कायदेशीर स्थिती आणि त्यातून निर्माण होणारा अडथळा याला प्राधान्य दिले गेले पाहिजे. अतिक्रमण हटविण्याची भूमिका घेताना प्रशासनाने एक बाब स्पष्ट ठेवली पाहिजे. सार्वजनिक रस्ते आणि पदपथ मोकळे ठेवणे आवश्यक असले, तरी लहान व्यावसायिकांच्या उपजीविकेचा प्रश्नही वास्तव आहे. हातगाडीधारक किंवा फेरीवाले यांच्यावर कारवाई करताना लागू कायदे, पात्र फेरीवाल्यांचे हक्क आणि उपलब्ध नियोजनबद्ध जागा यांचा विचार केला पाहिजे.मात्र, उपजीविकेचा प्रश्न पुढे करून सार्वजनिक रस्ते कायमस्वरूपी व्यापून ठेवण्याचे समर्थनही करता येणार नाही. यासाठी प्रशासनाने नियमबद्ध फेरीवाला क्षेत्रे, आवश्यक परवानग्या आणि वाहतुकीला अडथळा न आणणारी व्यवस्था याबाबत स्पष्ट धोरण राबविणे आवश्यक आहे. त्याचवेळी मोठ्या व्यावसायिक आस्थापनांसमोरील अतिक्रमणे, अनधिकृत शेड किंवा सार्वजनिक जागेचा खासगी वापर अशा प्रकरणांतही समान निकष लागू झाले पाहिजेत. कारवाई निवडक नसून नियमाधारित असल्याचा विश्वास नागरिकांना वाटणे गरजेचे आहे. महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा यांच्या निर्देशानुसार अतिक्रमण हटाव कारवाई होत असेल, तर आता तिच्या परिणामांचे मूल्यमापन करण्याची वेळ आली आहे. कोणत्या भागात किती अतिक्रमणे हटविली, किती ठिकाणी पुनरावृत्ती झाली, किती प्रकरणांत नोटिसा किंवा दंडात्मक कारवाई झाली आणि संबंधित जागा किती काळ मोकळी राहिली, याची माहिती प्रशासनाने संकलित करावी. प्रमुख अतिक्रमणप्रवण भागांची नियमित पाहणी करण्यासाठी जबाबदार अधिकारी निश्चित करता येतील. कारवाईनंतर ठरावीक कालावधीत पुनर्तपासणी करून त्याचा अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सादर करण्याची पद्धतही विकसित करता येईल. पुनरावृत्ती आढळल्यास संबंधित प्रकरणाची कारणमीमांसा करून पुढील कारवाई केली पाहिजे. महापालिकेने अतिक्रमण हटविण्यासाठी झालेला खर्च संबंधितांकडून वसूल करण्याचा इशारा दिला असेल, तर लागू कायदेशीर तरतुदींनुसार त्याची अंमलबजावणी कशी होते, हेही पारदर्शकपणे स्पष्ट झाले पाहिजे. केवळ इशारे देणे आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे यात फरक असतो.

# कोरिया वीक २०२६ चा भाग म्हणून मुंबईतील नॅशनल म्युझियम ऑफ इंडियन सिनेमा येथे कोरिया स्टोरी फेस्टिव्हल यशस्वीरित्या पार







उद्घाटन सोहळ्याला कोरियाचे महावाणिज्यदूत महामहिम श्री. यू डोंगवान; एनएमआयसीचे उपमहाव्यवस्थापक श्री. सत्यजित मंडल; अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते निलेश मल्होत्रा आणि डॉ. सुरीना मल्होत्रा (राष्ट्रीय अध्यक्ष - ऑल इंडिया आयटी सेल आणि एसएम - राष्ट्रवादी महिला काँग्रेस - शरदचंद्र पवार आणि क्रिएटिव्ह डायरेक्टर) यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच, तुर्कस्तानचे महावाणिज्यदूत महामहिम श्री. मुस्तफा केमलटिन एरुयगुर; इजिप्तच्या महावाणिज्यदूत महामहिम सुश्री डाहलिया तवाक्कोल; व्हिएतनामचे महावाणिज्यदूत महामहिम श्री. ले क्वांग बिएन; आणि थायलंडच्या महावाणिज्यदूत महामहिम सुश्री सिरिपोर्न सुफानिमितविसेटकुल हे देखील उपस्थित होते. कोरिया वीक २०२६ चा भाग म्हणून मुंबईतील नॅशनल म्युझियम ऑफ इंडियन सिनेमा () येथे कोरिया स्टोरी फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले होते. याचा उद्घाटन सोहळा १० ऑक्टोबर २०२६ रोजी पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन नॅशनल फिल्म डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन () आणि कोरियन फिल्म कॉन्सुलेट यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. यावेळी मुंबईतील कोरिया प्रजासत्ताकाचे महावाणिज्यदूत महामहिम श्री. यू डोंग-वान आणि  चे उपमहाव्यवस्थापक श्री. सत्यजित मंडाले उपस्थित होते. मुंबईतील पेडर रोडवरील  येथे झालेल्या या उद्घाटन सोहळ्यात इतर महत्त्वाचे पाहुणेही उपस्थित होते. महावाणिज्यदूत यू डोंग-वान यांनी सत्यजित मंडाले यांना पुष्पगुच्छ सादर केला. अभिनेते-निर्माते-दिग्दर्शक निलेश मल्होत्रा आणि त्यांच्या पत्नी, राजकीय नेत्या डॉ. सुरीना मल्होत्रा हे देखील उपस्थित होते. पहिल्या दिवशी द फेस रीडर हा कोरियन चित्रपट प्रदर्शित करण्यात आला आणि तो प्रेक्षकांना खूप आवडला. महावाणिज्यदूत यू डोंग-वान यांनी आपल्या भाषणाची सुरुवात नमस्तेने केली, ज्याला उपस्थितांकडून टाळ्यांचा कडकडाट मिळाला. त्यांनी एनएफडीसी () आणि नॅशनल म्युझियम ऑफ इंडियन सिनेमा यांचे आभार मानले आणि सांगितले की त्यांच्या पाठिंब्याशिवाय हा कार्यक्रम शक्य झाला नसता. १० ते २४ ऑक्टोबर दरम्यान आयोजित हा दोन आठवड्यांचा महोत्सव, भारत आणि कोरिया यांच्यातील वाढत्या संबंधांचा पुरावा आहे. लोकांना एकत्र आणण्यासाठी चित्रपट हे एक उत्तम माध्यम आहे; त्यामुळे, या महोत्सवात अनेक कोरियन चित्रपट प्रदर्शित केले जात आहेत. विशेष म्हणजे, रविवार, ११ ऑक्टोबर रोजी दोन चित्रपट प्रदर्शित करण्यात आले: ॲसॅसिनेशन - स्वातंत्र्याच्या लढ्यावर आधारित एक ॲक्शन-थ्रिलर - आणि आय कॅन स्पीक, मैत्री आणि आठवणींवर आधारित एक अप्रतिम चित्रपट. मुंबईतील कोरिया प्रजासत्ताकाच्या महावाणिज्यदूतावासाद्वारे आयोजित कोरिया वीक २०२६ हा दोन आठवड्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम आहे, ज्यामध्ये कोरियन चित्रपट, खाद्यसंस्कृती आणि के-ड्रामा यांचा समावेश आहे. भारतात कोरियन भाषा शिकण्याची आवड वाढत आहे आणि भारतीय शहरांमध्ये कोरियन रेस्टॉरंट्सची संख्या सातत्याने वाढत आहे. या सांस्कृतिक लाटेच्या पार्श्वभूमीवर कोरिया वीक २०२६ आयोजित होत असून, तो विविध प्रकारचे अनुभव देतो. नॅशनल म्युझियम ऑफ इंडियन सिनेमा येथील उद्घाटन सोहळ्यानंतर, उत्कृष्ट चित्रपटांची मालिका सुरू झाली, ज्यामुळे प्रेक्षकांना हृदयस्पर्शी नाटके पाहण्याची संधी मिळाली. हे चित्रपट प्रदर्शन कोरिया वीक २०२६ चा भाग आहे, जो एनएफडीसी () आणि कोरियन फिल्म कौन्सिल () यांनी संयुक्तपणे आयोजित केला आहे. कोरियन फिल्म फेस्टिव्हलच्या भागीदारीत सादर होणारा हा महोत्सव, देशातील काही अत्यंत प्रतिष्ठित चित्रपटांच्या माध्यमातून कोरियाचा इतिहास आणि संस्कृती सादर करतो. कोरियन चित्रपटसृष्टी तिच्या अनोख्या कथाकथन शैलीसाठी ओळखली जाते. निर्माता-दिग्दर्शक आणि अभिनेते निलेश मल्होत्रा म्हणाले की, मुंबईतील कोरिया वीकचे कार्यक्रम कोरियाचे उत्कृष्ट चित्रपट, परंपरा, संस्कृती आणि खाद्यसंस्कृती अनुभवण्याची संधी देतात. दोन आठवड्यांच्या या महोत्सवात कोरियाचा समृद्ध सांस्कृतिक वारसा आणि भारत-कोरिया संबंध अधिक दृढ होत असल्याचे अधोरेखित केले जाईल. या महोत्सवात कोरियन चित्रपट, खाद्यसंस्कृती, पारंपरिक आणि आधुनिक संस्कृती, फॅशन, तसेच व्यापार आणि आर्थिक देवाणघेवाण यांचा समावेश असेल. यामुळे प्रेक्षकांना कोरियाचा अनुभव घेण्याची आणि दोन्ही देशांमध्ये अर्थपूर्ण संबंध निर्माण करण्यास मदत करण्याची एक उत्तम संधी मिळते. कोरिया आणि भारत यांच्यातील लोकांमधील संबंध दृढ करण्यासाठी, मैत्री आणि भागीदारीचे मजबूत बंध साजरे करण्यासाठी, तसेच निरंतर सहभागासाठी नवीन मार्ग खुले करण्यासाठी हा कार्यक्रम एक उपक्रम आहे.

पान १ वरुन...

### सेवा संकल्प...

ढाकेफळ येथे ३ मुलींना एचपीव्ही लसीकरणाबाबत मार्गदर्शन करून लस देण्यात आली.

या उपक्रमातून किशोरवयीन मुलींच्या आरोग्य संरक्षणाला प्राधान्य देण्यात येत असून, ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत आरोग्यविषयक माहिती व सेवा पोहोचविण्याचा प्रयत्न आरोग्य विभागामार्फत करण्यात येत आहे.

### धर्मकार्यातील आवडीसोबत...

त्यामागील मुख्य उद्देश आहे. कीर्तन, प्रवचन आणि विविध धार्मिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे कार्य व्हावे, समाजात नैतिक मूल्यांची जोपासना व्हावी आणि सामाजिक एकतेची भावना अधिक दृढ व्हावी, यासाठी राष्ट्रमाता जिजाऊ नवरात्र महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

धर्म आणि संस्कृती ही समाजाला जोडणारी शक्ती आहे. आपल्या परंपरा, संतांचे विचार आणि महापुरुषांचे संस्कार पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजातील सर्व घटक एकत्र यावेत, त्यांच्यात बंधुभाव वाढावा आणि समाजहिताचा विचार रुजावा, यासाठी अशा उपक्रमांना महत्त्व असल्याचेही आमदार लोणीकर यांनी आपल्या मनोगतातून अधोरेखित केले. कीर्तनातून सामाजिक एकतेचा विषय मांडताना पुरुषोत्तम महाराज पाटील यांनी धार्मिक स्थळांवरील एखाद्या व्यक्तीच्या चुकीच्या कृत्याची जबाबदारी संपूर्ण समाजावर टाकणे योग्य नसल्याचे सांगितले. राम मंदिरातील चोरीच्या घटनेचा संदर्भ देत ते म्हणाले की, एखाद्या घटनेत काही व्यक्ती दोषी असतील, तर त्यासाठी संपूर्ण हिंदू समाजाला दोषी ठरवणे योग्य नाही. कोणत्याही व्यक्तीच्या चुकीच्या कृत्याचे मूल्यमापन पुराव्यांच्या आधारे व्हायला हवे. मात्र, अशा घटनांवरून समाजात परस्परांविषयी द्वेष निर्माण होणे ही चिंतेची बाब आहे. समाजातील विविध घटकांनी आपापल्या पातळीवर संघटित होऊन सामाजिक हितासाठी काम करण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे हिंदू समाजातही परस्परांतील मतभेद कमी होऊन एकतेची भावना दृढ व्हावी. राजकीय विचार वेगवेगळे असू शकतात; मात्र त्यामुळे सामाजिक सलोखा आणि परस्परांतील बंधुभाव कमी होता कामा नये, असा संदेश महाराजांनी दिला.

धर्म म्हणजे केवळ धार्मिक विधी किंवा परंपरांचे पालन नव्हे, तर चांगले विचार, सदाचार, परस्परांविषयी आदर आणि समाजाप्रती असलेली जबाबदारीही होय. भक्तीच्या माध्यमातून माणसाने माणसाशी जोडले गेले पाहिजे आणि समाजात सकारात्मक विचारांचा प्रसार झाला पाहिजे, असेही महाराजांनी आपल्या कीर्तनातून सांगितले.

राष्ट्रमाता जिजाऊ नवरात्र महोत्सवाच्या निमित्ताने आयोजित या कीर्तनाला भाविकांचा मोठा प्रतिसाद लाभला. भक्तिरसाबरोबरच सामाजिक ऐक्य, बंधुभाव आणि समाजप्रबोधनाचा संदेश देणाऱ्या या कीर्तनातून उपस्थितांना आत्मचिंतनाची दिशा मिळाली. धार्मिक परंपरेचे जतन करतानाच समाजात एकता आणि सद्भावना वृद्धिंगत करण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

यावेळी नगराध्यक्षा प्रियंका ताई शहाजी राक्षे शत्रुघ्न कणसे संपत टकले रमेश भापकर, संदीप बाहेकर, प्रकाश चव्हाण, शहराध्यक्ष प्रवीण  सातोनकर सोनू अग्रवाल सतीश सोनवणे इजरान कुरेशी सावता काळे, शहाजी राक्षे सुबोध चव्हाण संभाजी घनवट शुभम तेलगड ,, विक्रम धुमाळ , माऊली विष्णू गायकवाड कृष्णा आरगडे विजय यादव, राजेश ढवळे पिंटू काका ढवळे, पृथ्वीराज अंभोरे बंडू मानवतकर  अर्जुन जगताप, अर्जुन राठोड, मुन्ना चितोडा, वसंत राजबिंडे, दादू राक्षे पद्माकर कवडे रामप्रसाद गिरी अजित पोरवाल अमोल अग्रवाल अमर बगडिया प्रमोद राठोड, यांच्यासह मोठ्या  संख्येने महिला पुरुषांची उपस्थिती होती

### जिल्हा परिषदेत...

प्रकरणे विचारात घेतली जातील. पेन्शनविषयक प्रकरणे प्रलंबित असलेल्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी निर्धारित मुदतीत आपले अर्ज सादर करून या पेन्शन अदालतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### डॉ. गोपाळ तुपकर...

शिक्षण विस्तार अधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या पदोन्नतीबद्दल प्राथमिक शिक्षक गंगाधर वानोळे यांच्यासह शिक्षकवर्ग व शिक्षणप्रेमींनी डॉ. तुपकर यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा आहेत.

### राज्यस्तरीय कराट...

कांस्यपदकाची कमाई केली. मोहन हा श्री म.स्था. जैन विद्यालय, जालना येथील विद्यार्थी आहे. राज्यस्तरीय व्यासपीठावर पदक मिळवून त्याने आपल्या शाळेसह जालना जिल्ह्याचे नाव उंचावले. या तिन्ही खेळाडूंनी मिळविलेली पदके ही त्यांच्या सातत्यपूर्ण सरावाची, मेहनतीची आणि मार्गदर्शनाची फलश्रुती मानली जात आहे.

या स्पर्धेत जालना जिल्ह्यातील ऋषिकेश श्रीराम, कु. आकांक्षा चिल्का, यशवर्धन चिल्का आणि ओंकार गुट्टे यांनीही उत्कृष्ट प्रदर्शन केले. पदकांच्या पलीकडे जाऊन राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होणे, प्रतिस्पर्ध्यांचा सामना करणे आणि आपल्या खेळातील कौशल्य सादर करणे हा खेळाडूंच्या प्रगतीतील महत्त्वाचा टप्पा असतो. या खेळाडूंनी दाखविलेली जिद्द आणि सहभाग आगामी स्पर्धांसाठी त्यांचा आत्मविश्वास वाढविणारी ठरणार आहे.

जालना जिल्ह्यातील खेळाडूंना सेन्साई रुपेन्द्र पारचा आणि सेन्साई अमन पारचा यांचे मार्गदर्शन लाभले. खेळाडूंच्या तांत्रिक कौशल्यविकासासोबतच शिस्त, सातत्यपूर्ण सराव आणि स्पर्धेच्या दडपणाचा सामना करण्यासाठी आवश्यक तयारीवर प्रशिक्षणात भर दिला जातो. या मार्गदर्शनाचा फायदा खेळाडूंना राज्यस्तरीय स्पर्धेत झाला.

या स्पर्धेदरम्यान जालना जिल्ह्याचे सेन्साई रुपेन्द्र पारचा यांनी ततामी इन्चार्ज म्हणून जबाबदारी सांभाळली. तसेच जालना जिल्ह्याचे प्रशिक्षक म्हणून गणेश श्रीराम आणि नवीनकुमार वलकट्टी यांनी काम पाहिले. खेळाडूंच्या सहभागापासून ते स्पर्धेतील कामगिरीपर्यंत प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि सहकार्य महत्त्वाचे ठरले.

राज्यस्तरीय स्पर्धेत जालना जिल्ह्यातील खेळाडूंनी मिळविलेल्या यशाबद्दल महाराष्ट्र कराटे असोसिएशनचे उपाध्यक्ष सेन्साई सुरेश ठाकरे, सचिव शिहान जॉजी अब्राहम, सहसचिव सेन्साई अनिल मिरकर आणि कार्यकारी सदस्य सेन्साई संदीप मनोरे यांनी खेळाडूंचे कौतुक केले.

जालना शहराचे उपमहापौर राजेश राऊत, नगरसेवक महावीर ढक्का, नगरसेवक विक्रांत ढक्का, राहुल मांडोत, माजी नगरसेवक संजय भगत, रितेश जयस्वाल, श्री म.स्था. जैन इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका श्रीमती कुलकर्णी, श्री म.स्था. जैन विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री वानगोता, श्री म.स्था. जैन प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती पोरवाल, यादव बापू , सुजित माने, लखन कणसे तसेच पालकवर्गाने यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन केले.

या सर्वांनी खेळाडूंना पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा देत त्यांनी भविष्यातही अशीच कामगिरी करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. आजच्या काळात कराटेसारख्या मार्शल आर्ट्समुळे विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, आत्मविश्वास, एकाग्रता, शिस्त आणि प्रसंगावधान यांचा विकास होण्यास मदत होते. राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये सहभाग घेतल्याने खेळाडूंना आपल्या कौशल्याची चाचणी घेण्याची आणि राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी तयारी करण्याची संधी मिळते.

४७ व्या महाराष्ट्र स्टेट कराटे चॅम्पियनशिपमध्ये जालना जिल्ह्याच्या खेळाडूंनी केलेली कामगिरी ही जिल्ह्यातील नवोदित खेळाडूंसाठी प्रेरणादायी आहे. तीन पदकांसह इतर खेळाडूंनी दाखविलेल्या कौशल्यामुळे जालन्यातील कराटे क्षेत्राची वाटचाल आशादायी असल्याचे चित्र समोर आले आहे. आगामी स्पर्धांमध्येही जालना जिल्ह्यातील खेळाडूंनी यशाची ही परंपरा कायम ठेवावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### जालन्याच्या कैलास...

आणि शारीरिक अडथळ्यांवर मात करत त्यांनी मिळवलेले हे कांस्यपदक, कोणत्याही सुवर्णपदकापेक्षा कमी नाही. ही केवळ एका पदकाची गोष्ट नसून, ती जालन्यातील प्रत्येक खेळाडूसाठी जगण्याची नवी प्रेरणा आहे.

**८१ किमी भागीरथी - मृत्यूला हरवणारी जिद्द!**

जगातील सर्वात कठीण आणि मोठी मानली जाणारी ८१ किमी भागीरथी नदी जलतरण स्पर्धा यशस्वीरित्या पूर्ण करणारे कैलास झोळगे हे देशातील मोजक्या खेळाडूंपैकी एक आहेत. भागीरथी नदीच्या प्रचंड प्रवाहात, रात्रंदिवस पाण्यात राहून, लाटांशी, थकव्याशी आणि थंडीशी झुंज देत हे अंतर कापणे म्हणजे केवळ खेळ नाही, तर मृत्यूवर मात करण्याची जिद्द आहे. अनेक जण १-२ किमी पोहून थकतात, तिथे ८१ किमीचा हा प्रवास म्हणजे हिमालय सर करण्यासारखाच आहे.

शाकाहारी जालन्याचे पहिले फुल आयर्नमॅन - मांसाहाराशिवायही अशक्य शक्य!

आज अनेकांना वाटते की ताकदीसाठी मांसाहार आवश्यक आहेत, पण कैलासजींनी हा गैरसमज खोटा ठरवला आहे. ते कट्टर शाकाहारी असूनही फुल आयर्नमॅन आहेत. म्हणजेच एकाच दिवशी ३.८ किमी पोहणे + १८० किमी सायकलिंग + ४२.२ किमी मॅरेथॉन धावणे!असे एकूण२२६ की मी केवळ १५ तासात पूर्ण करून हा पराक्रम  त्यांनी सिद्ध केले की, शुद्ध शाकाहारी आहार, डाळ-भात-भाकरी आणि सात्विक जेवणातही विश्वविक्रम करण्याची ताकद आहे.

**तसेच६०० किमी सायकलिंग - फ्रान्सच्या  मध्ये भारताचा झेंडा!**

फ्रान्सच्या      ने आयोजित केलेली जगातील सर्वात कठीण सायकलिंग मालिका -किमी, ४०० ,३०० किमी आणि ६०० किमी चे टप्पे त्यांनी अविरतपणे करून त्यानं पोडियम फिनिशर्स ठरले केले आहेत. ६०० किमी म्हणजे जालना ते गोवा आणि परत! सलग ३३ तास झोप न घेता, पायांना विश्रांती न देता सायकल चालवणे, हे फक्त पायांचे नाही तर मनाचेही बळ आहे. या कामगिरीमुळे त्यांना सुपर रँडोनियर हा आंतरराष्ट्रीय किताबही मिळाला आहे.

**संघर्षातून यशाकडे - खरी प्रेरणादायी वाटचाल!**

या यशामागे मोठा संघर्ष आहे. नोकरी, कुटुंबाची जबाबदारी सांभाळून पहाटे ४ वाजता उठून सराव, जालन्यात अद्ययावत सोयी नसताना केलेली तयारी, आर्थिक अडचणी आणि निवड चाचणीतील आव्हाने - या  सगळ्यांवर त्यांनी त्यांच्या पत्नी, कुटुंबाच्या सहाय्याने मात केली. त्यांची अनमोल साथ हेच माझ्या यशाचे रहस्य असे झोळगे ह्यांनी नमूद केले.

अनेक खेळाडू, महिला आणि पुरुषांसाठी प्रेरणास्थान!

१. महिलांसाठी संदेश : ‘‘वय, संसार, जबाबदारी हे अडथळे नाहीत. रोज फक्त एक तास स्वतःसाठी काढा.‘‘

२. पुरुषांसाठी संदेश : ‘‘व्यसन, मोबाईल आणि टेन्शन सोडा. फिटनेस नसेल तर पैसा, पद, प्रतिष्ठा सगळे व्यर्थ आहे.‘‘

३. युवकांसाठी संदेश : ‘‘शॉर्टकटने यश मिळत नाही. सातत्य, शिस्त आणि मेहनत हाच खरा मार्ग आहे.‘‘

**फिटनेसचे महत्त्व - आजची गरज!**

आज मधुमेह, रक्तदाब, लठ्ठपणा यांसारखे आजार लहान वयातच जडत आहेत. अशा वेळी कैलासजी सांगतात, ‘‘औषधाच्या गोळ्यांपेक्षा घामाचा एक थेंब केव्हाही चांगला. रोज १ तास पोहणे, चालणे किंवा सायकलिंग करा. फिटनेस हीच तुमची खरी बँक बॅलन्स आहे. त्यांच्या या प्रेरणादायी वाटचालीमुळे जालन्यातील अनेकांनी आता पहाटे जलतरण तलावाची वाट धरली आहे. त्यांच्या कार्यामुळे जालना जिल्हा ‘‘फिट जालना, हिट जालना‘‘ या मोहिमेतही आघाडीवर येत आहे.

# जेष्ठ नृत्यांगना व अभिनेत्री मधू कांबीकर यांच्या निधनाने लोककलेला मोठा धक्का!

लोककला ही महाराष्ट्राची अभुतपुर्व कला आहे परंतु अचानक लोककलेवर आघात जर झाला तर याची हळहळ संपूर्ण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात दिसून येते.लोककला,रंगभूमी आणि चित्रपट क्षेत्रात स्वतः चा वेगळा ठसा उमटविणाऱ्या ज्येष्ठ नृत्यांगना व अभिनेत्री मधू कांबीकर याचे वयाच्या ७३ वर्षी १२ ऑक्टोबरला दीर्घ आजाराने निधन झाले. २०१६ मध्ये अर्धांगवायू (पॅरालिसिस) चा आजार झाला तेव्हा पासून त्या अंथरूणाला खिळून असल्याने त्यांचे जिवन असह्य झाले व दिर्घ आजाराने येरवडा येथील त्यांच्या निवासस्थानी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाने चित्रपटसृष्टीसह लावणी आणि रंगभूमीच्या क्षेत्राततील त्यांची भरीव कामगिरी आणि त्यांनी लोककलेचा उमटविलेला ठसा मावळल्याने संपूर्ण कला सृष्टीसह राज्यात शोककळा पसरली.कारण महाराष्ट्रातील लोकांना मनोरंजनाची आणि आनंदाची दिशा देण्यासाठी मधू कांबीकरांनी कलेच्या माध्यमातून सर्वस्व पणाला लावले व सर्वांना हसत-खेळत ठेवले.मराठी लोककला आणि चित्रपटसृष्टीत आपल्या अभिनयाचा ठसा उमटवणाऱ्या ज्येष्ठ अभिनेत्री आणि प्रसिद्ध लावणी कलावंत मधू कांबीकर यांच्या निधनाने लावणी प्रेमी व लोककला प्रेमी यांना मोठा धक्का बसला आहे.

मधू कांबीकर हे नाव घेतलं की डोळ्यांसमोर उभा राहतो तो लावणीचा रंगमंच, लोककलेचा बाज आणि अभिनयाची वेगळी छाप! ग्रामीण महाराष्ट्राच्या मातीत रुजलेल्या लोककलेला आपल्या अभिनयाच्या जोरावर व्यापक ओळख मिळवून देण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली व यातून अनेक कलावंत निर्माण सुध्दा झाले. लावणी, लोकनाट्य, नाटक आणि चित्रपट अशा विविध माध्यमांतून त्यांनी रसिकांची मने जिंकली व आपलं वेगळं स्थान निर्माण करून महाराष्ट्राला कला प्रेमी करण्यास मोठे योगदान दिले.गावखेड्याच्या मातीत वाढलेल्या लोककलेला मोठ्या व्यासपीठावर नेऊन प्रोत्साहित करण्याचे दायित्व त्यांनी स्वीकारले त्यामुळे लोककला आज महाराष्ट्रासह इतरही राज्यात दिसून येते याचे श्रेय मधू कांबीकरांना जाते कारण लोककलेला मोठ्या शिखरावर नेणं ही काही साधी गोष्ट नाही. परंतु हे शिखर फत्ते करण्यात मधू कांबीकर अग्रेसर रहाल्या व महाराष्ट्राचे नाव लौकिक केले.त्यासाठी त्यांनी निरंतर कलेवर निष्ठा, मेहनत आणि प्रचंड जिद्द याकडे नेहमीच लक्ष केंद्रित केले.मधू कांबीकर यांनी आपल्या कलाप्रवासातून हे सर्व दाखवून दिलं. त्यांच्या अभिनयात ग्रामीण जीवनाचा बाज, लोकसंस्कृतीची झलक आणि रंगभूमीचा जिवंतपणा अनुभवायला मिळत होता.

आज लोककलेला जे मोठे व्यासपीठ मिळाले आहे त्याचे संपूर्ण श्रेय मधू कांबीकरांना जाते.मधू कांबीकर रंगमंचावर लावणी सादर करीत असताना २०१६ मध्ये अचानक त्यांची प्रकृती बिघडली व त्यानंतर त्यांना पॅरालिसिसचा झटका आला आणि गेल्या काही वर्षांपासून त्या आजाराशी कडवी झुंज देत होत्या व अंथरुणाला खिळून राहण्याची वेळ आली, तरी त्यांच्या नावाशी जोडलेल्या कलात्मक आठवणी मात्र रसिकांच्या मनात कायम आहे आणि रहातील. त्यामुळे आजही मधू कांबीकरांची कला संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे त्या आपल्यात नसल्या तरी त्यांच्या कलेतील प्रत्येक क्षण सर्वांच्या स्मरणात राहील.एकेकाळी आपल्या कलेने रंगमंच गाजवणाऱ्या या ज्येष्ठ कलावंताच्या निधनाने लोककलेच्या क्षेत्रातील एक महत्त्वाचा अध्याय संपला असला तरी त्याची आठवण निरंतर राहील.हि बाब सत्य एखादा महान कलाकार आपल्यातून निघून जातो तेव्हा ती जागा कुणीच भरून काढू शकत नाही फक्त आठवणी तेवढ्या शिल्लक रहातात.त्यामुळे मधू कांबीकरांच्या निधनाने लोककलेचे मोठे नुकसान झाले असून संपूर्ण महाराष्ट्रातील कलाप्रेमी आज दुःखाच्या छायेत दिसून येते.मधू कांबीकर यांच्या निधनाने केवळ चित्रपटसृष्टीवर किंवा लावणी क्षेत्रावर नव्हे, संपूर्ण कलासृष्टीवर मोठा आघात झाला आहे.

आपल्या विविधांगी भूमिकांनी मराठी चित्रपटसृष्टीला,लोककलेला सदैव समृद्ध करणाऱ्या मधू कांबीकर यांच्या निधनाने मराठी कलाक्षेत्राची मोठी हानी झाली आहे.भावपूर्ण श्रद्धांजली.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर**

## गोषेगावात रंगला कलागुणांचा महाकुंभ..

### 'सत्यशोधक महोत्सव २०२६'चा दिमाखदार समारोप; विद्यार्थी अन् पालकांच्या उत्साहाने परिसर दुमदुमला..



**भोकरदन - प्रतिनिधी**

स्थापना दिनानिमित्त सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,गोषेगाव येथे आयोजित 'सत्यशोधक महोत्सव २०२६' उत्साहात संपन्न झाला.गीतगायन, नृत्य,चित्रकला, संगीत खुर्ची आणि बकेट बॉल अशा विविध स्पर्धांमुळे महोत्सवात रंगत निर्माण झाली.निल्लोड, गव्हाली, कायगाव, मोरवाडी गव्हाली, निमगाव, जिवरग टाकळी, वजीरखेड यांसह विविध गावांतील विद्यार्थी व पालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. गीतगायनात श्रद्धा गोराडे, अनुष्का शिंदे व अर्णव जाधव यांनी यश मिळवले. नृत्य स्पर्धेत प्रणाली शिंदे यांच्यासह इतर विद्यार्थ्यांनी बाजी मारली, तर चित्रकला स्पर्धेत दिव्या फुके, अजिंक्य मोहिते व दुर्वेश गरुड यांनी यश संपादन केले. पालकांच्या संगीत खुर्ची स्पर्धेत कविता मोहिते, तर बकेट बॉल स्पर्धेत इस्माईल शेख यांनी प्रथम क्रमांक मिळविला.स्पर्धेतील विजेत्यांना संस्थेचे अध्यक्ष तथा विद्यालयाचे प्राचार्य सुनील वाकेकर आणि मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.अध्यक्ष सुनील वाकेकर व सचिव श्रीमती जयश्री बनकर यांच्या मार्गदर्शनाखाली महोत्सव यशस्वी झाला. कार्यक्रमासाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांनी परिश्रम घेतले.

## आगरी-कोळ्यांचे श्रद्धास्थान एकविरा आई, लोणावळा...!!

एकविरा आई तू डोंगरावरी नजर हाय तुझी कोल्यांवरी.. हे गाणं ऐकताच डोळ्यांसमोर उभे राहतात ते आगरी-कोळी बांधव.. याचं आगरी-कोळ्यांची देवी म्हणजे कार्त्यात वसलेली एकविरा देवी.. मुंबईपासून १०० किलोमीटर अंतरावर असलेल्या लोणावळा येथील आई एकविरा देवी मंदिराला नवरात्रीत नक्कीच भेट द्यायला हवी. हे मंदिर महाभारत काळातील आहे. असे म्हटले जाते की, पांडवांनी त्यांच्या वनवासात फक्त एका रात्रीत हे मंदिर बांधले होते. चला तर मग जाणून घेऊयात या मंदिराची खास वैशिष्ट्ये.

आगरी-कोळ्यांचे देवस्थान..

लोणावळा हे नैसर्गिकरित्या अतिशय सुंदर ठिकाण आहे. येथे कार्ला लेणी आहेत, जिथे आगरी-कोळ्यांचे देवस्थान असलेली एकविरा देवीचे मंदिर आहे. या मंदिराची खासियत म्हणजे ज्या गुहांच्या शेजारी एकविरा देवीची पूजा केली जाते, त्या गुहा एकेकाळी बौद्ध धर्माचे केंद्र मानल्या जात होत्या.

पांडवांनी एका रात्रीत बांधले देवीचे मंदिर..!!

महाभारताच्या कथेनुसार, पांडव वनवासात पोहचताच सर्व पांडव बंधू




आपल्यावर झालेल्या घोर अन्यायाबद्दल बोलू लागले. त्यांचे हे शब्द ऐकून डोंगरात विराजमान असलेल्या एकविरा देवीचे मन हेलावले आणि तिने त्यांना संकटातून बाहेर पडण्यास मदत केली. देवी म्हणाली, हे पांडवपुत्रांनो, मी तुमचे भाग्य बदलू शकत नाही कारण तुमचा जन्म एका महान कार्यासाठी झाला आहे. पण, मी तुम्हाला या दिवसांतून बाहेर पडण्यासाठी नक्कीच मदत करू शकते. देवीचे हे शब्द ऐकताच पांडव देवीपुढे नतमस्तक झाले. त्यानंतर देवीने पांडवांची परीक्षा घेतली आणि म्हटले की जर वनवास सोपा करायचा असेल तर तुम्हाला देवीचे मंदिर बांधावे लागेल, पण या मंदिराचे बांधकाम एका रात्रीत पूर्ण करावे लागेल. एकविरा आईचे आव्हान स्वीकारून पांडवांनी रात्रभर जागे राहून डोंगराच्या मधोमध हे मंदिर बांधले आहे. मंदिर बांधताच पांडवांनी देवीला हात जोडून तिला मंदिरात येण्यास सांगितले. पांडवांची हाक ऐकून एकविरा देवीने पुन्हा दर्शन दिले आणि अज्ञातवासात त्यांना कोणीही ओळखणार नाही, असे वरदान दिले.

एकविरा देवी ही जलदेवता म्हणुन प्रसिध्द आहे.

जलदेवता म्हणजे ज्या लोकांचा पाण्याशी जास्त संबध येतो. कोळी, आगरी या लोकांचा व्यावसाय हा पूर्णपणे पाण्याशी संबधीत आहे. त्यामूळेच या समाजाने आई एकविरेला कुलदैवत मानलं आहे. आई एकवीरा क्षत्रीय, वैश्य, शुद्र समाजाची कुलदैवता असल्या कारणाने ती अति प्राचीन देवता असावी असा इतिहास संशोधकांचे मत आहे.आई एकविरा मातेची कहाणी स्कंदपुराण, महाभारत, गणेश पुराण, काली पुराण यांमधुन सांगितली गेली आहे. प्रत्येक ठिकाणी आपल्याला वेगवेगळे संदर्भमिळतात.

आणि म्हणूनच इतिहासकारांसाठी हे मंदिर एक गुढ मानले जाते. पण देवीच्या भाविकांसाठी मात्र ती संकटात तारुन येणारी, नवसाला पावणारी एकविरा आई आहे.



**हभप शिवाजी**
**विठ्ठल चौगुले**
**कागल-कोल्हापूर.**
**९८६७७३२५०४**

## महाराष्ट्रात तीव्र दुष्काळ, शेतीचा वाढलेला खर्च अन बळीराजा उद्धवस्त!

### 'माँ संस्थेचे राष्ट्रपती, पंतप्रधानांसह प्रमुख मंत्र्यांना धडक निवेदन; तातडीच्या मदतीची मागणी

**जालना -प्रतिनिधी**

महाराष्ट्रात सध्या ओढवलेला तीव्र दुष्काळ, शेतीचा गगनाला भिडलेला उत्पादन खर्च, मजूर आणि कामगारांचे कोलमडलेले अर्थकारण यामुळे बळीराजा आणि सर्वसामान्य जनता अक्षरशः आर्थिक संकटात सापडली आहे. या विदारक परिस्थितीकडे केंद्र व राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी जालना येथील 'माँ सेवाभावी बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने अप्पर जिल्हाधिकारी मिसाळ यांच्यामार्फत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, अर्थमंत्री निर्मला सीतारमण, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्यासह महत्त्वाच्या मंत्र्यांना अत्यंत सविस्तर निवेदन पाठवण्यात आले आहे.



शासनाकडून नुकसानीचे पंचनामे करताना किंवा मदत जाहीर करताना कागदी घोडे नाचवले जातात, परंतु वास्तवात शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च किती वाढला आहे, याचा साधा विचारही केला जात नाही, असा संतप्त आरोप संस्थेने केला आहे. निवेदनात पिकांच्या खर्चाचा लेखाजोखा दिला. कापूस पीक (१ एकर): मशागत, बियाणे (२ बॅग - १८०० रुपये), खते (४ बॅग - ९२०० रुपये), औषध फवारणी (८१०० रुपये), खुरपणे आणि वेचणी मिळून एका एकरासाठी तब्बल ३८,००० रुपये खर्च येतो. या हिसाबानुसार १ हेक्टरसाठी (अंदाजे २.२० एकर) हा खर्च थेट ९५,००० रुपयांवर जाऊन पोहोचतो. सोयाबीन पीक (१ एकर): नांगरणी, बियाणे, खते, औषध फवारणी आणि काढणी मिळून १ एकर सोयाबीनसाठी १९,८०० रुपये, तर १ हेक्टरसाठी सुमारे ४९,५०० रुपये खर्च येतो.

महाराष्ट्रातील सर्व शेतकरी व सहकारी सोसायट्यांचे कर्ज सरसकट पूर्णपणे माफ करावे. दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांना व महामंडळांना विशेष आर्थिक पॅकेज जाहीर करावे.

प्रत्येक गावात आणि तांड्यांवर तातडीने जनावरांसाठी चारा छावण्या व पिण्याच्या पाण्यासाठी टँकर सुरू करावेत. जनावरांच्या चारा व पेंढीसाठी प्रति दिन ७०० रुपये (महिन्याला २१,००० रुपये) अनुदान थेट दिले जावे. दुष्काळामुळे त्रस्त झालेल्या गरीब शेतकऱ्यांनी व सामान्यांनी सोनारांकडे मनी-मंगळसूत्र व दागिने तारण ठेवले आहेत. काही सोनार ३ टक्के व्याज आकारून हे सोने हडपण्याचा कट रचत आहेत. सरकारने तातडीने मुद्दल रक्कम भरून गरिबांचे सोने बिनव्याजी परत मिळवून द्यावे. कृषी पंप आणि ट्रान्सफार्मरचे ओव्हरलोडिंग रोखण्यासाठी नवीन रोहित्र बसवून शेतकऱ्यांना २४ तास अखंडित वीज पुरवठा उपलब्ध करून द्यावा. दुष्काळजन्य परिस्थितीमुळे राज्यातील सर्व शाळा व महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांची फी पूर्णपणे माफ करून मोफत शिक्षणाचे आदेश काढावेत.

स्वस्त धान्य दुकानांमार्फत एनपीएच कार्डधारकांना पीएच मध्ये रूपांतरित करून धान्याचा कोटा वाढवावा, शिवभोजन थाळ्यांची संख्या वाढवावी आणि संजय गांधी निराधार व श्रावणबाळ योजनेचे अनुदान दरमहा १० तारखेच्या आत बँक खात्यात जमा करावे. सध्याच्या भीषण दुष्काळात शेतकरी, मजूर आणि गोरगरीब हवालदिल झाले आहेत. दुसरीकडे, सुशिक्षित बेरोजगार नोकऱ्यांच्या प्रतीक्षेत असून शासकीय कार्यालयातील रिक्त जागा भरल्या जात नाहीत. जर शासनाने या मागण्यांची तात्काळ दखल घेतली नाही, तर तीव्र आंदोलनाचा इशारा 'माँ संस्थेच्या वतीने देण्यात आला आहे.या धडक निवेदनावर 'माँ सेवाभावी बहुउद्देशीय संस्था, जालनाचे अध्यक्ष बाबासाहेब शिवाजी वानखेडे, उपाध्यक्ष प्रा. डॉ. विजय कुमठेकर, सदाशिव छगनराव वाघमारे, राजु विठ्ठलराव इंगळे, संतोष शेषराव गायकवाड, सुरेश पुंजाराम रत्नपारखे, ॲड. रामेश्वर खांडेभराड आणि पंडीत खुशालराव डनगळ, सचिन वानखेडे, दिपक दांडगे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. सदरील निवेदन स्पीड पोस्टने १ ते २० मान्यवरांना पाठविण्यात आले.

## सावरगाव हडप ग्रामपंचायत पोटनिवडणुकीवर आक्षेप; निवडणूक रद्द करण्याची मागणी

**जालना- प्रतिनिधी**

मौजे सावरगाव हडप (ता. जि. जालना) येथील ग्रामपंचायत प्रभाग क्रमांक १ मधील पोटनिवडणुकीचा कार्यक्रम नागरिकांच्या निदर्शनास येईल अशा पद्धतीने प्रसिद्ध करण्यात आला नसल्याचा आरोप करत, ही पोटनिवडणूक रद्द करून नव्याने निवडणूक घेण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात भीम आर्मी सामाजिक संघटनेच्या वतीने राजेंद्र उर्फ राजू विठ्ठलराव आढाव यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार अर्ज सादर केला आहे.

सावरगांव हडप वार्ड क्रं. १ मधील ग्रामपंचायत सदस्याचे निधन झाल्यामुळे पोटनिवडणूक जाहीर करण्यात आली होती. मात्र, निवडणूक कार्यक्रमाची योग्य प्रसिद्धी न झाल्याने गावातील नागरिकांना आणि इच्छुक उमेदवारांना वेळेत माहिती मिळाली नाही. त्यामुळे अनेक इच्छुकांना नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची संधी मिळाली नसल्याचा आरोप तक्रारदाराने केला आहे. निवडणूक कार्यक्रमाची प्रसिद्धी करणे ही संबंधित तलाठी व ग्रामसेवकांची जबाबदारी असताना, त्यांनी याबाबत योग्य कार्यवाही केली नसल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकारामुळे निवडणूक प्रक्रिया पारदर्शकतेने पार पडली नसल्याचा दावा करण्यात आला आहे.सदर पोटनिवडणूक बिनविरोध होण्यामागे कार्यक्रमाची प्रसिद्धी न होण्याचा प्रकार कारणीभूत असल्याचा संशय व्यक्त करत, संबंधित तलाठी व ग्रामसेवकांची चौकशी करून दोषी आढळल्यास त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी आढाव यांनी केली आहे. सदर पोटनिवडणूक तातडीने रद्द करून नियमानुसार नव्याने निवडणूक प्रक्रिया राबवावी, अशी मागणी तक्रारदाराने जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

# ई कचऱ्याविषयी जागरूकता हवी

### ( जागतिक ई कचरा दिनानिमित्त विशेष लेख )

आज १४ ऑक्टोबर, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक ई कचरा दिवस म्हणून साजरा केला जातो. ई कचरा कमी करणे आणि ई कचऱ्याचा पुनर्वापर या बाबत जनजागृती करणे हा या दिवसा मागचा उद्देश आहे. २०१८ साली पहिल्यांदा जागतिक कचरा दिवस साजरा करण्यात आला. पर्यावरण आणि मानवी आरोग्यासाठी धोकादायक असलेला ई कचरा ही जगातील आज सर्वात मोठी समस्या बनली आहे. आपल्या रोजच्या जगण्यामध्ये इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल सेवांचा वापर जसा वाढत चालला आहे तसतसा इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा डोंगरही वाढत चालला आहे. उपयुक्तता संपलेल्या आणि तांत्रिक बिघाडामुळे वापरण्यायोग्य नसलेल्या वस्तू फेकून दिल्या जातात आणि मग त्याचा ई कचरा बनतो. फक्त महाराष्ट्राचा विचार केला तर महाराष्ट्रात दरवर्षी ५० हजार टन हून अधिक ई कचरा जमा होतो तर देशात ५ लाख टन ई कचरा वर्षाला तयार होतो. महाराष्ट्र खालोखाल आंध्र प्रदेश, तामिळनाडू, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यात सर्वाधिक ई कचरा तयार होतो. आपल्या देशातच इतका ई कचरा तयार होत असेल तर जगात किती ई कचरा तयार होत असेल याचा विचार न केलेलाच बरा. ई कचऱ्याची समस्या इतकी गंभीरपणे आ वासून उभी असतानाही आपण ई कचऱ्या विषयी जागृत नाही. काहींना तर ई कचरा म्हणजे काय हे देखील माहीत नाही. ई कचरा म्हणजे तुमच्या आमच्या घरातील निकामी झालेल्या किंवा वापरात नसलेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तू ज्या सहजपणे आपण इतर कचऱ्यासोबत बाहेर फेकतो. या कचऱ्याचा निचरा देखील आपण इतर कचऱ्या प्रमाणेच करतो. घरगुती वापरातील टीव्ही, टेप, रेडिओ, टू इन वन, फ्रिज, मिक्सर, वॉशिंग मशीन, कुलर, एअर कंडिशनर, इलेक्ट्रॉनिक कुकर, मायक्रोव्हेव, ओव्हन, हीटर, पंखे यासारख्या इलेक्ट्रॉनिक वस्तू निकामी झाल्या की त्याला ई कचरा असे संबोधले जाते. यासोबतच महिति तंत्रज्ञान क्षेत्रातील उपकरणे जसे संगणक, लॅपटॉप, टॅब, फोन, मोबाईल, बॅटरी, सर्किट बोर्ड, हार्ड डिस्क, पेन ड्राईव्ह, सिडी, व्ही सिडी यांचा ई कचऱ्यात समावेश होतो. अशा प्रकारे निकामी झालेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंना ई कचरा असे म्हणतात. इलेक्ट्रॉनिक वस्तूंमध्ये भरपूर प्रमाणात सजीवांना अपायकारक घटक असतात. हे अपायकारक घटक पर्यावरणातील हवा, मती आणि पाण्यात मिसळले की सभोतालची हवा, पाणी आणि माती दूषित होती. मोबाईलची किंवा कोणत्याही बॅटरीची निर्मिती शिसे वापरून केली जाते. हे शिसे पावसाच्या पाण्यात झिरपून हवेतील आर्द्रतेमध्ये मिसळून संबंधित हवा, पाणी आणि दूषित होते. अमेरिकेतील एका पर्यावरण संवर्धन संस्थेच्या म्हणण्यानुसार दरवर्षी ३० दशलक्ष संगणक निकामी झाले की फेकून दिले जातात. यापैकी वीस टक्क्यांहून कमी संगणकाचे पूनार्विनिकरण केले जात नाही. युरोपमध्ये तर दरवर्षी सुमारे १०० दशलक्ष फोन फेकून दिले जातात. कालबाह्य ठरलेली, निकामी झालेली ही उपकरणे पर्यावरणातील जागा वेगाने व्यापत आहेत. निष्काळजीपणे फेकलेल्या काही उपकरणांमध्ये बोरोलियम, कॅडीमियम, पारा आणि शिसे यासारखी घातक घटक असतात. या घटकांना वातावरणात संमिश्र होण्यास अवकाश लागत असला तरी खूप जास्त प्रमाणात जेंव्हा हे वातावरणात मिसळले जातात तेंव्हा पर्यावरणाची मोठी हानी होते. एकूणच ई कचऱ्यामुळे पर्यावरणाची मोठी हानी होत आहे. हे लक्षात घेता ई कचऱ्याच्या समस्येवर वेळीच आणि गांभीर्याने विचार करण्याची नितांत गरज आहे. ई कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी विशिष्ट प्रक्रिया अवलंबणे आवश्यक आहे. त्याचा निचरा इतर कचऱ्यासोबत न करता त्याचा निचरा करण्यासाठी भिन्न प्रक्रिया राबवली पाहिजे. ई कचऱ्याचे नियोजन आणि विल्हेवाट लावण्याच्या प्रक्रियेत या कचऱ्याचे संकलन त्याचे रिसायक्लिंग आणि त्याचे मॅन्यूफॅकचरिंग महत्वाचे आहे. त्यासाठी सार्वजनिक व खाजगी क्षेत्राने संयुक्त रुपात पायाभूत सुविधा उभाराव्या लागतील. पर्यावरण मंत्रालयाने सादर केलेल्या ई कचरा व्यवस्थापन नियम २०२२ च्या मसुद्यात ई कचरा व्यवस्थापनामध्ये उत्पादक, पुनर्वापर संस्था आणि संघटना सर्वांची जबाबदारी निश्चित केली गेली आहे. ती जबाबदारी प्रत्येक घटकाने पार पाडल्यास काही प्रमाणात ही समस्या मिटेल.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५**

# सर्वसामान्यांनाच पाणीबचतीचे धडे; जार विक्रेते, वॉशिंग सेंटरवर कारवाई कधी?

## जारमधून पाणी विकणाऱ्या व्यावसायिकांच्या प्रक्रियेची तपासणी करा; पाणीबचतीचे आवाहन केवळ नागरिकांपुरते मर्यादित न ठेवता व्यावसायिक वापरावरही नियंत्रण आणण्याची मागणी

**दीपक शेळके**

जालना : शहरात कमी पर्जन्यमानामुळे आगामी काळात संभाव्य पाणीटंचाईचे संकट निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात असताना, महानगरपालिका प्रशासनाने पाणीबचतीसाठी कडक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. पाणीचोरी, अनधिकृत नळजोडण्या आणि पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी दोन विशेष भरारी पथके स्थापन करण्यात आली असून, वाहने धुणे, गुरे-जनावरे धुणे आणि रस्त्यावर पाणी टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. मात्र, पाण्याची टंचाई केवळ सर्वसामान्य नागरिकांच्या निष्काळजीपणामुळे निर्माण होत नाही. शहरात व्यावसायिक कारणांसाठी होणाऱ्या पाण्याच्या वापराचे आणि त्यातून निर्माण होणाऱ्या संभाव्य अपव्ययाचेही मूल्यमापन होणे गरजेचे आहे. पिण्याच्या पाण्याचे जार तयार करणाऱ्या केंद्रांमध्ये फिल्टरेशन प्रक्रियेदरम्यान नाकारले जाणारे पाणी आणि वॉशिंग सेंटरमध्ये वाहनांच्या धुलाईसाठी वापरले जाणारे पाणी यावर महापालिका प्रशासन लक्ष देणार का, असा महत्त्वाचा प्रश्न आता उपस्थित होत आहे. पावसाचे प्रमाण कमी राहिल्यास त्याचा परिणाम केवळ शेतीवरच होत नाही, तर शहरांच्या पाणीपुरवठा व्यवस्थेवरही होतो. जलाशयांमधील उपलब्ध साठा, पाणीपुरवठ्याचे नियोजन, वाढती लोकसंख्या आणि दैनंदिन पाण्याची मागणी यांचा समतोल राखण्याचे आव्हान प्रशासनासमोर उभे राहते. अशा परिस्थितीत पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे अपरिहार्य ठरते.

पाणीटंचाईची तीव्रता वाढल्यानंतर नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागू शकते. घरगुती वापर, स्वयंपाक, स्वच्छता आणि इतर मूलभूत गरजांसाठी पाणी उपलब्ध करून देताना प्रशासनाची दमछाक होण्याची शक्यता असते. पाणीपुरवठ्याच्या वेळा कमी होणे, कमी दाबाने पाणी येणे किंवा पर्यायी व्यवस्थेवर अवलंबून राहण्याची वेळ येणे, अशा अडचणींचा सामना नागरिकांना करावा लागू शकतो. त्यामुळे संकट तीव्र होण्यापूर्वीच पाण्याचा अपव्यय रोखणे आणि उपलब्ध जलसाठ्याचे योग्य नियोजन करणे महत्त्वाचे आहे. याच पार्श्वभूमीवर महानगरपालिकेने नागरिकांना नळांना तोट्या बसविणे, गळती दुरुस्त करणे आणि पिण्याच्या पाण्याचा अनावश्यक वापर टाळणे याबाबत आवाहन केले आहे. मात्र, पाणीबचतीचे हे आवाहन शहरातील प्रत्येक घटकाला समानपणे लागू होणार का, हा या प्रश्नातील महत्त्वाचा मुद्दा आहे.

शहरात पिण्याच्या पाण्याचे जार भरून विक्री करणाऱ्या केंद्रांमध्ये पाणी शुद्ध करण्यासाठी विविध प्रकारच्या फिल्टरेशन प्रक्रिया वापरल्या जातात. काही रिव्हर्स ऑस्मोसिस यंत्रणांमध्ये शुद्ध पाण्यासोबत काही प्रमाणात नाकारलेले पाणीही बाहेर पडते. यंत्रणेचा प्रकार, पाण्याची गुणवत्ता, तंत्रज्ञान आणि देखभाल यानुसार या पाण्याचे प्रमाण बदलते. काही ठिकाणी हे पाणी योग्य पद्धतीने गोळा करून स्वच्छता किंवा इतर योग्य कामांसाठी वापरणे शक्य असते; मात्र ते थेट नाल्यात सोडले जात असल्यास त्याचा पुनर्वापर करण्याची शक्यता तपासणे आवश्यक आहे.

जार विक्रीचा व्यवसाय हा नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणारा महत्त्वाचा व्यवसाय असला, तरी पाणी शुद्ध करण्याच्या प्रक्रियेत किती पाणी वापरले जाते, किती पाणी शुद्ध स्वरूपात मिळते आणि उर्वरित पाण्याचे काय केले जाते, याचा हिशेब असणे गरजेचे आहे. शहरातील अशा केंद्रांमध्ये वापरल्या जाणाऱ्या यंत्रणांची क्षमता, पाण्याचा वापर, नाकारलेल्या पाण्याचे प्रमाण आणि त्याच्या पुनर्वापराची व्यवस्था यांची तपासणी करण्यासाठी




महापालिका प्रशासन पुढाकार घेणार का? प्रत्येक जार विक्री केंद्र पाण्याचा अपव्यय करते, असा सरसकट निष्कर्ष काढता येणार नाही. मात्र, संभाव्य पाणीटंचाईच्या काळात व्यावसायिक वापरातून होणारी पाण्याची नासाडी टाळण्यासाठी वस्तुस्थितीवर आधारित तपासणी करणे आवश्यक आहे. पाणी वाचविण्याचे आवाहन करणाऱ्या प्रशासनाने या व्यवसायाकडेही दुर्लक्ष न करता पाण्याच्या वापराचे मूल्यमापन करावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

दुसरीकडे, शहरातील वाहन धुलाई केंद्रांचाही प्रश्न महत्त्वाचा आहे. दुचाकी, चारचाकी आणि इतर वाहने धुण्यासाठी या केंद्रांमध्ये पाण्याचा वापर केला जातो. वापरलेले तंत्रज्ञान, वाहनांची संख्या, धुलाईची पद्धत आणि पाण्याच्या पुनर्वापराची सुविधा यानुसार प्रत्येक केंद्रातील पाण्याचा वापर वेगवेगळा असतो. काही ठिकाणी पाण्याचा नियंत्रित वापर करणारी उपकरणे आणि पुनर्वापराच्या सुविधा असू शकतात; तर काही केंद्रांमध्ये पाण्याचा वापर अधिक कार्यक्षम करण्याची गरज असू शकते. त्यामुळे सर्वच वॉशिंग सेंटर पाण्याचा अपव्यय करतात, असे म्हणण्याऐवजी प्रत्यक्ष तपासणी करून पाण्याचा वापर, गळती, पुनर्वापर आणि उपलब्ध बचत उपायांचा आढावा घेणे गरजेचे आहे. विशेषतः पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर वाहन धुलाईसाठी पिण्यायोग्य पाण्याचा वापर होत आहे का, कमी पाण्यात धुलाई शक्य करणारी उपकरणे वापरली जातात का, तसेच वापरलेले पाणी प्रक्रिया करून पुन्हा वापरण्याची व्यवस्था आहे का, याची तपासणी महापालिकेने करावी. परिस्थितीनुसार व्यावसायिक पाणीवापरासाठी स्पष्ट नियम, आवश्यक अटी आणि तपासणीची यंत्रणा निश्चित करण्याची गरज आहे.

महापालिका प्रशासनाने सर्वसामान्य नागरिकांना वाहने धुण्यासाठी पाण्याचा अपव्यय करू नका, असा इशारा दिला आहे. मग व्यावसायिक पातळीवर दररोज अनेक वाहनांची धुलाई होत असताना तेथे पाणीबचतीच्या उपाययोजनांचे पालन होते की नाही, याची खातरजमा कोण करणार, असा सवाल उपस्थित होत आहे.

महानगरपालिकेने पाणीचोरी आणि अपव्यय रोखण्यासाठी दोन विशेष भरारी पथके नियुक्त केली आहेत. एका पथकामार्फत जालना-जायकवाडी मुख्य जलवाहिनीवरील अनधिकृत नळजोडण्या आणि तलावांवरील अनधिकृत विद्युत मोटारींवर कारवाई केली जाणार आहे. दुसरे पथक शहरातील पाणीगळती, अवैध नळजोडण्या आणि पाण्याचा गैरवापर करणाऱ्यांवर लक्ष ठेवणार आहे. या मोहिमेमुळे अनधिकृत पाणीउपसा आणि उघडपणे होणारा अपव्यय रोखण्यास मदत होऊ शकते. परंतु, कारवाई केवळ घरगुती वापरापुरती किंवा सर्वसामान्य नागरिकांपुरती मर्यादित राहिल्यास पाणीबचतीच्या व्यापक उद्दिष्टाला मर्यादा येऊ शकतात. त्यामुळे जार निर्मिती केंद्रे, वॉशिंग सेंटर आणि मोठ्या प्रमाणावर पाणी वापरणाऱ्या इतर व्यावसायिक आस्थापनांचा समावेशही परिस्थितीनुसार तपासणीच्या कक्षेत आणणे आवश्यक आहे.

याचा अर्थ सर्व व्यावसायिकांवर सरसकट निर्बंध लादावेत, असा नाही. उलट, पाण्याचा वापर करणाऱ्या प्रत्येक घटकासाठी पारदर्शक, व्यवहार्य आणि समान निकष निश्चित करणे महत्त्वाचे आहे. नियमांचे उल्लंघन आढळल्यास नियमानुसार कारवाई आणि पाण्याचा कार्यक्षम वापर करणाऱ्यांना प्रोत्साहन, अशी दुहेरी भूमिका प्रशासनाने स्वीकारल्यास पाणीबचतीची मोहीम अधिक परिणामकारक ठरू शकते.

### प्रशासनाने कोणत्या उपाययोजना कराव्यात?

संभाव्य पाणीटंचाईचे गांभीर्य लक्षात घेऊन महापालिका प्रशासनाने पुढील उपाययोजनांचा विचार करणे आवश्यक आहे. शहरातील जार विक्री व पाणीशुद्धीकरण केंद्रांमध्ये पाण्याचा वापर आणि फिल्टरेशननंतर उरणाऱ्या पाण्याचे प्रमाण तपासावे., नाकारलेल्या पाण्याचा योग्य पुनर्वापर करण्यासाठी तांत्रिकदृष्ट्या व्यवहार्य उपाय सुचवावेत., वाहन धुलाई केंद्रांमध्ये पाण्याचा वापर, गळती आणि पुनर्वापराच्या सुविधांचे सर्वेक्षण करावे., मोठ्या प्रमाणावर पाणी वापरणाऱ्या व्यावसायिक आस्थापनांसाठी लागू नियमांनुसार पाणीबचतीच्या अटी स्पष्ट कराव्यात., तपासणी, नोटिसा आणि दंडात्मक कारवाईची प्रक्रिया पारदर्शक ठेवावी., पिण्याच्या पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी नागरिकांसोबत व्यावसायिकांमध्येही जनजागृती करावी. या उपाययोजना राबविताना पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता, सार्वजनिक आरोग्य, व्यवसायाची व्यवहार्यता आणि लागू कायदेशीर तरतुदी यांचा समतोल राखणेही आवश्यक आहे.पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा असल्याचे सांगत प्रशासन नागरिकांना काटकसरीचे आवाहन करीत आहे.

ही भूमिका निश्चितच आवश्यक आहे. परंतु, पाण्याची नासाडी कोणत्याही स्वरूपात होत असेल, तर ती रोखण्यासाठी प्रशासनाने समान गांभीर्याने प्रयत्न करणे अपेक्षित आहे जार विक्री केंद्रांमध्ये फिल्टरेशन प्रक्रियेदरम्यान किती पाणी वाया जाते? त्यातील किती पाण्याचा पुनर्वापर होऊ शकतो? शहरातील वॉशिंग सेंटरमध्ये दररोज किती पाणी वापरले जाते? तेथे पाणीबचतीच्या सुविधा आहेत का? या व्यवसायांच्या पाणीवापराची तपासणी करण्यासाठी महापालिकेकडे काही स्वतंत्र यंत्रणा आहे का? आणि संभाव्य पाणीटंचाईच्या काळात अशा व्यावसायिक वापरावर नियंत्रण आणण्यासाठी प्रशासन काय पावले उचलणार आहे?

या प्रश्नांची उत्तरे प्रत्यक्ष तपासणी आणि अधिकृत आकडेवारीतून समोर येणे गरजेचे आहे. पाणीटंचाई ही केवळ नागरिकांची समस्या नाही, तर संपूर्ण शहरासमोरील सामूहिक आव्हान आहे. त्यामुळे पाणीबचतीचे नियम सर्वांना समानपणे लागू होतात का, हे प्रशासनाच्या कृतीतून स्पष्ट झाले पाहिजे. सर्वसामान्यांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन करतानाच व्यावसायिक क्षेत्रातील पाणीवापर आणि संभाव्य अपव्ययावरही महापालिका प्रशासनाने लक्ष केंद्रित करावे. अन्यथा, 'पाणी वाचवा' हा संदेश केवळ नागरिकांपुरता मर्यादित राहतो की काय, असा प्रश्न उपस्थित होत राहील.

# जालन्यात पाणीचोरी करणाऱ्यांवर महापालिकेचा 'वॉच'; दोन विशेष भरारी पथके मैदानात!

जालना शहरात कमी पर्जन्यमानामुळे आगामी काळात संभाव्य पाणीटंचाईचे संकट निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन जालना शहर महानगरपालिका प्रशासनाने पाणीचोरी आणि पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी कंबर कसली आहे. शहराचा उपलब्ध जलसाठा जपून वापरण्यासोबतच पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करण्यासाठी महापालिकेने दोन विशेष भरारी पथके गठीत केली आहेत. जालना-जायकवाडी मुख्य जलवाहिनीवरील अवैध नळजोडण्या, पाणीगळती, तलावांमधून अनधिकृतपणे पाणी उपसण्यासाठी बसविण्यात आलेल्या विद्युत मोटारी तसेच पिण्याच्या पाण्याचा गैरवापर करणाऱ्यांवर आता प्रशासनाची करडी नजर राहणार आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना नोटिसा बजावून त्यांच्यावर थेट दंडात्मक आणि कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे महानगरपालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे. महानगरपालिका आयुक्तांच्या निर्देशानुसार ८ ऑक्टोबर २०२६ रोजी शहरातील पाणीपुरवठा व्यवस्था आणि संभाव्य पाणीटंचाईच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत शहराला होणारा पाणीपुरवठा, उपलब्ध जलसाठा, पाणीगळती रोखण्याचे उपाय, अनधिकृत नळजोडण्यांचा प्रश्न आणि पाणीबचतीसाठी करावयाच्या उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. त्यानंतर पाणीचोरी रोखणे आणि पाण्याचा अपव्यय करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी दोन स्वतंत्र पथके कार्यान्वित करण्यात आली आहेत. जालना शहराच्या पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या जालना-जायकवाडी मुख्य जलवाहिनीवर आता नियमित पेट्रोलिंग करण्यात येणार आहे. या जलवाहिनीवरून शेतकरी किंवा इतर नागरिकांनी अनधिकृतपणे नळजोडण्या घेतल्या असल्यास त्या शोधून काढण्याची जबाबदारी पहिल्या पथकाकडे सोपविण्यात आली आहे. मुख्य जलवाहिनीवरील अनधिकृत जोडण्यांमुळे पाणीपुरवठ्याच्या व्यवस्थेवर परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन अशा प्रकारांना आळा घालण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या पथकामध्ये जुना जालना पाणीपुरवठा वितरण प्रमुख राजू मोरे, नवीन जालना पाणीपुरवठा प्रमुख तथा बोअरिंग विभागप्रमुख लक्ष्मीकांत नाकाडे आणि त्यांच्यासोबत सर्व लाईनमनचा समावेश आहे. हे पथक मुख्य जलवाहिनीची तपासणी करणार असून अवैध नळजोडण्या आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई केली जाणार आहे.

मोती तलाव, मुक्तेश्वर तलाव आणि संत गाडगेबाबा घाणेवाडी जलाशय येथे थेट विद्युत मोटारी बसवून पाणी उपसले जात असल्याच्या प्रकारांना प्रतिबंध घालण्यासाठीही महापालिकेने विशेष उपाययोजना आखल्या आहेत. या जलस्रोतांवर बसविण्यात आलेल्या अनधिकृत विद्युत मोटारी शोधून त्या जप्त करणे, संबंधितांना नोटिसा बजावणे आणि पाणीचोरी रोखणे, अशी जबाबदारी पहिल्या पथकाला देण्यात आली आहे. याशिवाय शहरातील विहिरी आणि हातपंपांची दुरुस्ती करून ते नागरिकांसाठी वापरण्यायोग्य करण्याचे कामही या पथकामार्फत केले जाणार आहे. संभाव्य पाणीटंचाईच्या काळात उपलब्ध पर्यायी जलस्रोतांचा उपयोग वाढविणे आणि नागरिकांना पाणी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ही उपाययोजना महत्त्वाची ठरणार आहे.

पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी महापालिकेने दुसरे विशेष पथक नियुक्त केले आहे. नोडल अधिकारी राजेश बगळे यांच्या नेतृत्वाखाली हे पथक काम करणार असून त्यामध्ये मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी कनिष्ठ अभियंत्यांचा समावेश आहे. शहरातील विविध भागांमध्ये तपासणी करून पाणीगळती, अनधिकृत नळजोडण्या आणि पाण्याचा गैरवापर करणाऱ्यांवर लक्ष ठेवले जाणार आहे. वाहने धुण्यासाठी पिण्याच्या पाण्याचा अनावश्यक वापर करणे, गुरे-जनावरे धुण्यासाठी मोठ्या प्रमाणात पाणी वाया घालवणे तसेच रस्त्यावर पाणी टाकणे अशा प्रकारांची तपासणी केली जाणार आहे. अशा प्रकारे पाण्याचा अपव्यय होत असल्याचे आढळल्यास संबंधितांना कायदेशीर नोटिसा बजावून नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. शहरात दररोज तपासणी मोहीम राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. चालू वर्षातील कमी पर्जन्यमानाच्या पार्श्वभूमीवर आगामी काळात शहराच्या पाणीपुरवठ्याचे नियोजन करणे महापालिका प्रशासनासाठी महत्त्वाचे ठरणार आहे. उपलब्ध पाणीसाठ्याचा काटकसरीने वापर करणे, पाणीगळती रोखणे आणि अनधिकृत पाणीउपसा बंद करणे या उपाययोजनांमुळे उपलब्ध जलसाठ्याचा अधिक कार्यक्षम वापर करण्यास मदत होऊ शकते. मात्र, प्रशासनाच्या कारवाईसोबतच नागरिकांचे सहकार्यही तितकेच आवश्यक आहे. पाणीपुरवठा यंत्रणेतील गळती वेळेत दुरुस्त करणे, अधिकृत नळजोडण्यांचा वापर करणे आणि पाण्याचा अनावश्यक वापर टाळणे यामुळे संभाव्य टंचाईचा सामना करण्यासाठी मदत होऊ शकते. महानगरपालिका प्रशासनाने शहरवासीयांना पाण्याचा वापर अत्यंत काटकसरीने करण्याचे आवाहन केले आहे.

घरातील नळांना तोट्या बसवाव्यात, नळ सुरू ठेवून पाणी वाहू देऊ नये आणि अंतर्गत जलवाहिन्यांमधील गळती तातडीने दुरुस्त करावी. पिण्याच्या पाण्याचा वापर वाहने धुण्यासाठी किंवा रस्त्यावर पाणी शिंपडण्यासाठी करू नये. तसेच अनधिकृत नळजोडण्या न घेता अधिकृत जोडणीच्या माध्यमातूनच पाणी वापरावे, असे आवाहन करण्यात आले आहे. संभाव्य पाणीटंचाईच्या काळात प्रत्येक थेंबाचे महत्त्व ओळखून नागरिकांनी पाणीबचतीला प्राधान्य द्यावे. पाणीचोरी आणि अपव्यय रोखण्यासाठी महापालिका प्रशासनाने सुरू केलेल्या मोहिमेला नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन जालना शहर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.